आकाशवाणी पुणे

पुणे वृत्तांत

वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

29.09.2024

---

<u>पंतप्रधान</u>

पुण्याच्या वाढत्या लोकसंख्येमुळे शहराच्या विकासाचा वेग मंदावू नये आणि वाढत्या शहरीकरणाच्या काळात पुणे विकासाचं एक महत्त्वाचं केंद्र व्हावं यासाठी महायुती सरकार प्रयत्नशील असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. पुणे मेट्रोच्या शिवाजीनगर न्यायालय ते स्वारगेट या मार्गाचं उद्घाटन, स्वारगेट ते कात्रज या नवीन विस्तारित मार्गिकेचं आणि पुण्यातील भिडेवाडा स्मारकाचं भूमिपूजन पंतप्रधानांच्या हस्ते दुरस्थ माध्यमातून आज झालं; त्यावेळी ते बोलत होते. याच कार्यक्रमात सोलापूर विमानतळ आणि बिडकीन प्रकल्प राष्ट्राला समर्पित करण्यात आला.

महाराष्ट्रातल्या या आधीच्या सरकारकडे दृष्टिकोन आणि नियोजन नसल्याने पुण्यातली मेट्रो इतर शहरांच्या तुलनेने उशिरा सुरू झाली, अशी टीका पंतप्रधानांनी यावेळी केली. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी मुलींची पहिली शाळा ज्या ठिकाणी सुरू केली; त्या ठिकाणी उभारण्यात येणारं स्मारक सर्वांसाठी प्रेरणा देणारं ठरेल असं पंतप्रधान म्हणाले.

यानिमित्त पुण्यात गणेश कला क्रीडा रंगमंच इथं  झालेल्या प्रत्यक्ष कार्यक्रमात राज्यपाल सी. पी राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार तसंच केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ उपस्थित होते.

पायाभूत सुविधा आणि उद्योग क्षेत्रात महाराष्ट्र देशात अग्रेगर आहे, असं मुख्यमंत्री आपल्या भाषणात म्हणाले. पुण्याचा झपाट्याने विकास होत असताना इथली वाहतूक कोंडी कमी करणं ही राज्य शासनाची जबाबदारी आहे; म्हणूनच पुण्याच्या मेट्रोचा विस्तार करण्यात येत असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. पुरंदर विमानतळाचा प्रश्न लवकर मार्गी लावावा अशाही सूचनाही त्यांनी संबंधितांना दिल्या.

या उद्घाटन सोहळ्यानंतर मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आणि अजित पवार तसंच अन्य मान्यवरांनी पुणे मेट्रोच्या नवीन मार्गावरून प्रवास केला. आज दुपारी चार वाजल्यापासून स्वारगेट ते शिवाजीनगर न्यायालय ही भुयारी मेट्रो सेवा नागरिकांसाठी सुरू झाली आहे.

पुणेमनपा

केंद्र सरकारच्या नमस्ते अभियानातल्या स्वच्छता मित्र सुरक्षा उपक्रमांतर्गत आज पुणे महापालिकेच्या वतीनं स्वच्छता मित्रांना उपयुक्त साधनं आणि आयुष्यमान कार्ड वितरण करण्यात आलं. केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री डॉ वीरेंद्र कुमार यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

मतदानशपथ

पिंपरी चिंचवड महानगर पालिका आणि रोटरी क्लब ऑफ निगडीनं आज 'रनथॉन' हा उपक्रम आयोजित केला होता.

यात ४ हजारांहून अधिक धावपटू, आणि सायकलपटूंनी आगामी विधानसभा निवडणुकीत मतदान करण्याची शपथ घेतली. निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका विविध उपक्रम राबवत आहे. त्याचाच एक भाग म्हणून हा उपक्रम घेण्यात आला.

उन्नतग्रामअभियान

राज्यातल्या सर्वच जिल्ह्यात प्रधानमंत्री जनजाती उन्नत ग्राम अभियानाचा प्रारंभ येत्या दोन ऑक्टोबर रोजी होणार आहे. पुणे जिल्हयातील १९ गावांचा या अभियानात समावेश आहे. केंद्र सरकारने अर्थसंकल्पात या अभियानाची घोषणा केली होती. आदिवासी क्षेत्र आणि समुदायाच्या  सर्वांगीण विकासासाठी हे अभियान राबवलं जाणार आहे. आदिवासीसाठी काम करणाऱ्या सामाजिक संघटना, आणि आदिवासी स्वयंसेवकांनी आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाशी समन्वय साधावा असं आवाहन पुणे आदिवासी विभागाचे प्रकल्प अधिकारी प्रदीप देसाई यांनी केलं आहे.

कार्यशाळा

पुण्यातील कृषी विज्ञान केंद्रात कृषिक स्वर्ण समृध्दी आठवड्या अंतर्गत ड्रॅगन फ्रुट आणि अॅवाकॅडो उत्पादन कार्याशाळा नुकतीच पार पडली. यासाठी पुण्यासाह लातूर, नाशिक, नगर, सोलापूर, जळगाव आणि बीड जिल्ह्यातील ११२ शेतकरी उपस्थित होते.

बाजार समिती

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून नव्वद ट्रक फळभाज्यांची आवक झाली. मागणी वाढल्याने सिमला मिरची, टोमॅटो, फ्लॉवर महागले तर कांदा आणि घेवड्याच्या भावात घसरण झाली. गेल्या आठवड्यापासून पालेभाज्यांच्या भावात घसरण होत आहे. तर फुल बाजारातही मंदीचं वातावरण आहे.

रेबीज

जागतिक रेबीज लसीकरण दिन काल झाला; यानिमित्त पिंपरी चिंचवडमध्ये कालपासून रेबीज प्रतिबंधक लसीकरणाला सुरुवात करण्यात आली. येत्या 5 ऑक्टोबरपर्यंत महापालिकेच्या सर्व पशुवैद्यकीय केंद्रांमध्ये आणि श्वान संगोपन केंद्रांमध्ये लसीकरणाची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे; या काळात अनेक जनजागृतीपर उपक्रमही राबवले जात आहेत.

अपघात

येवलेवाडी इथं आज दुपारी दिड वाजता एका काचेच्या कारखान्यात वस्तू गाडीतून उतरवताना काचा फुटल्या आणि त्यात पाच कामगार अडकले. अग्निशमन दलाच्या जवानांनी पाचही कामगारांना गंभीर जखमी अवस्थेत बाहेर काढून रुग्णालयात दाखल केलं.
मात्र रुग्णालयात उपचारादरम्यान चार कामगारांचा मृत्यू झाला; तर एकजण गंभीर जखमी असल्याची माहिती आमच्या वार्ताहरानं दिली आहे.

हवामान

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 30 अंश तर किमान तापमान 21 पूर्णांक 3 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं; उद्याही तापमान साधारण असंच असेल दुपारनंतर आकाश अंशतः ढगाळ असेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.